# आम्ही पार्लेकर

१९९१ पासून

प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३३ वे  अंक चौथा  पृष्ठे १२  एप्रिल २०२४  www.parlekar.com

Registered-RNI no. 54781/92


या अंकात


पान ०२ ज्येष्ठ साहित्यिका माधवी कुंटे लिखित पुस्तकांची शतकपूर्ती

पान ०७ खिशांत फक्त ७ डॉलर......

पान ०८ World of Mobile Applications

पान ०९ शिव – शक्ति : आकाशगंगेचे धागेदोरे !





# भारताच्या तिहेरी यशात प्रबोधन क्रिडा संकुलाचा मोलाचा वाटा

प्रबोधनकार क्रीडा संकुल येथे खऱ्या अर्थाने पिकलं बॉल चे तंत्रशुद्ध ट्रेनिंग दिले जात आहे. याची पोचपावती म्हणजे आशियाई पिकल बॉल स्पर्धेत भारताला मिळालेले तिहेरी यश.



नुकत्याच पार पडलेल्या पिकलं बॉल आशियाई स्पर्धेत भारताने ३ सुवर्ण २ रौप्य आणि २ कास्य पदकांची कमाई करत पदक तालिकेत अव्वल क्रमांक प्राप्त केला. गेली जवळपास ३ वर्ष आशियाई पिकलं बॉल स्पर्धेतील आपला दबदबा कायम ठेवण्यात भारतीय खेळाडू यशस्वी ठरले आहेत विविध वयोगटात होत असलेल्या या स्पर्धेत भारताकडून खेळताना खुल्या पुरुष दुहेरी गटात विलेपार्लेतील मयूर पाटील याने सुवर्ण



पदक पटकावले तर वंशिक कपाडिया आणि तेजस महाजन या जोडीला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. तर ५०+ वयोगटात पुरुष एकेरी स्पर्धेत संदीप तावडे यांनी उत्तम कामगिरी करत सुवर्ण पदक पटकावले. मिश्र दुहेरीत आपला दबदबा कायम ठेवत वंशिक व वृषाली ठाकरे या जोडीने या भारतीय संघाच्या



यशामागे भारतीय पिकलं बॉल संघटनेचे अध्यक्ष श्री.अरविंद प्रभू आणि इतर पदाधिकारी यांनी प्रचंड मेहनत घेतली आहे पिकलं बॉल हा तुलनेने नवीन आलेल्या खेळात आज श्री. अरविंद प्रभू यांच्या नेतृत्वा खाली देशाला मोठे यश प्राप्त होत आहे लवकरच हा खेळ ऑलिम्पिक स्पर्धेत समाविष्ट होईल असा विश्वास जागतिक संघटनेचे सुद्धा अध्यक्ष असलेले श्री.अरविंद प्रभू यांनी व्यक्त केला.






## संपादकीय

आचार्य अत्र्यांचे एक प्रसिद्ध वाक्य आहे. 'इतर राज्यांना भूगोल असेल पण महाराष्ट्राला भूगोलाबरोबरच इतिहास सुद्धा आहे.' आपल्या पार्ल्याला सुद्धा हे तंतोतंत लागू पडते. मुंबई शहरात अनेक उपनगरे आहेत. माहीम कॉजवे व शीव पलीकडील मुख्य मुंबई आणि त्यालाच जोडून असणारी पूर्व व पश्चिम उपनगरे. जशी शहरातील वस्ती वाढत गेली तसतशी उपनगरे विस्तारत गेली, लोकसुद्धा परवडणारी घरे शोधत ह्या उपनगरात स्थायिक झाले. ह्यातील बहुतेक उपनगरे ही आर्थिक गरजेपोटी निर्माण झालेली, म्हणूनच बिन चेहेऱ्याची आहेत, फार थोडी आपली ओळख टिकवण्यात, वाढवण्यात यशस्वी झाली आहेत व आपले पार्ले हे निश्चितच त्यापैकी एक आहे.

गेल्या शतकाच्या सुरवातीला मुंबई ही एक कामगार नगरी होती. कापड गिरण्या, कारखाने आणि बंदरावरची माल वहातुक हीच ह्या शहराची वैशिष्ट्ये होती. हळूहळू नोकरीदार चाकरमानी समाज उदयास आला तो गिरगावच्या आसपास व यथावकाश तो पार्ल्यापर्यंत पोहोचला तो त्याची सर्व वैशिष्ट्ये घेऊनच !

दीड शतकापेक्षा जास्त मोठी परंपरा असणारे आपले पार्ले आज मुंबईचे एक महत्वाचे उपनगर झाले आहे. शिक्षणाचे माहेरघर आणि मुंबईची सांस्कृतिक राजधानी अशी बिरुदे मिरवणारी आपली पार्लेनगरी आता क्रीडानगरी व उद्योगनगरी म्हणूनही नावारूपाला येत आहे.

नुकतेच ज्येष्ठ साहित्यिका माधवीताई कुंटे ह्यांच्या शंभराव्या पुस्तकाचे प्रकाशन झाले. अष्टपैलू प्रतिभा व आभाळाएवढे कर्तृत्व गाठीशी असूनही सर्वांशी मिळूनमिसळून अत्यंत साधेपणाने वागणाऱ्या माधवीताई म्हणूनच सर्व पार्लेकरांना वंदनीय आहेत.

ह्यावर्षीचा पार्ले भूषण पुरस्कार नुकताच प्रसिद्ध उद्योजक दीपक घैसास ह्यांना प्रदान करण्यात आला. घरी कुठलीही औद्योगिक पार्श्वभूमी नसताना केवळ स्वतःच्या मेहेनतीने, कर्तृत्वाने आपला उद्योग जगभर पसरवणारे, अनेक आस्थापनांना सल्ला देणारे आणि तरीही अत्यंत साधेपणाने राहणारे, सर्वांमध्ये सहजपणे मिसळणारे दीपकजी आज अनेक तरुणांचे स्फूर्तिस्थान असले तर त्यात नवल नाही.

नुकत्याच इंडोनेशिया मध्ये झालेल्या पिकलबॉलच्या आशियायी स्पर्धेत भारताने उज्ज्वल यश मिळवले आणि त्यात पार्ल्याच्या प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचा महत्वाचा वाटा होता. ह्या पोरांनी तर आपल्या पार्ल्याचे नाव जगभरात पोहोचवले की हो !

ह्या आणि अश्या अनेक सिताऱ्यांनी उजळलेल्या आपल्या पार्लेनगरीला 'नक्षत्रांचे बेट' म्हटले तर ते चुकीचे ठरू नये, होय ना !

पार्लेकर

संपादक
ज्ञानेश चांदेकर

संपादकीय सहाय्य
तानिया गायकवाड
editorial@parlekar.com

जाहिरात व्यवस्थापन
marketing@parlekar.com

सजावट व मांडणी
विश्वास महाशब्दे – ऐस ग्राफिक्स

निर्मिती
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई–४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई–मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

# ज्येष्ठ साहित्यिका माधवी कुंटे लिखित पुस्तकांची शतकपूर्ती

सांस्कृतिक आणि साहित्यिकदृष्ट्या आम्ही पार्लेकर किती समृद्ध आणि भाग्यवान आहोत त्याचा प्रत्यय देणारा एक कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. शनिवार दि. २३ मार्च रोजी लोकमान्य सेवा संघ येथे एका दिमाखदार सोहळ्यात आदरणीय माधवीताई कुंटे यांच्या पुस्तकांची शतकपूर्ती साजरी झाली. विख्यात साहित्यिका मंगलाताई गोडबोले यांच्या हस्ते



'हिरा ठेविता ऐरणी' आणि नामवंत कथालेखिका व संपादिका मोनिका गजेंद्रगडकर यांच्या हस्ते 'कथा मंजिरी' या कथासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आमदार ॲड. पराग अळवणी, नवचैतन्य प्रकाशनाचे शरद मराठे आणि डिंपल पब्लिकेशनचे अशोक मुळे यांनी आपापले मनोगत व्यक्त केले. त्यात त्यांनी आजवर शंभर वाचनीय आणि दर्जेदार पुस्तकांची निर्मिती करणाऱ्या माधवीताईंच्या लेखनाचा झपाटा तसेच त्यांच्या ऋजू पटकथालेखन, मालिकांसाठी संवादलेखन, दूरदर्शन तसेच रेडिओवरील कार्यक्रम अशा नानाविध क्षेत्रात लक्षवेधी कामगिरी केली आहे. ''शब्द या माध्यमाच्या सर्व शक्यता




आजमावणाऱ्या आणि जीवनानुभवाशी प्रामाणिक राहणाऱ्या वाचनीय साहित्यिका" अशा शब्दांत मंगलाताई गोडबोले यांनी त्यांच्या वैविध्यपूर्ण लेखनप्रवासाचा गौरव केला.

'हिरा ठेविता ऐरणी' ही कादंबरी म्हणजे एका बुद्धिमान, लावण्यवती व कणखर स्त्रीची कहाणी. हिरा हा जितका सुंदर, मौल्यवान तितकाच कणखर असतो. ऐरणीवर ठेवून घण घातले तरी तो फुटत नाही. नाट्य व संपादन क्षेत्रात भरीव कामगिरी करणारी प्रभा ही या कादंबरीची नायिका त्या हिऱ्यासारखीच. सगळे घाव कणखरपणे सोसणारी. मंगलाताईंनी आपल्या भाषणात या कादंबरीची वैशिष्ट्ये नमूद केली.

नवीन लेखिकांना लिहितं करणाऱ्या आणि योग्य मार्गदर्शनातून घडवणाऱ्या 'कथाक्लब' या संपादिका अशी दुहेरी ओळख असणाऱ्या मोनिका गजेंद्रगडकर यांनी 'कथामंजिरी' मधील कथांचे मार्मिक विश्लेषण केले. स्त्रियांची विविध रूपे समर्थपणे उलगडणाऱ्या या कथांमध्ये कोठेही स्त्रीवादाचा कर्कशपणा नाही. या कथा वाचकांशी हितगुज करतात अशा शब्दात त्यांनी माधवीताईंच्या कथांचा अभ्यासपूर्ण आलेख मांडला.

माधवीताईंनी आपल्या छोटेखानी मनोगतात साहित्यक्षेत्रातील स्नेही, लेखनाची संधी देणारे प्रकाशक, वितरक, संपादक, वेळोवेळी दाद देणारे वाचक, कुटुंबीय आणि खास या कार्यक्रमासाठी लांबलांबून उपस्थित राहिलेल्या सुहृदांच्या प्रति कृतज्ञता आणि आनंद व्यक्त केला.

कुंटे कुटुंबियांतर्फे माधवीताईंच्या स्नुषा अपर्णा कुंटे यांनी 'घरातल्या' माधवीताईंचे खास पैलू सांगतानाच आधुनिक तंत्राशी जुळवून घेण्याच्या व ते सर्व उत्साहाने शिकून घेण्याच्या त्यांच्या वृत्तीचा विशेष कौतुकाने उल्लेख केला. या संपूर्ण कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन चित्रा वाघ यांनी केले.

आजवर विविध क्षेत्रातील थोर मान्यवरांनी पार्ल्याच्या सांस्कृतिक समृद्धीमध्ये आपला ठसा उमटवलेला आहे. त्यांच्यापैकी एक महत्त्वाचे नाव असलेल्या माधवीताईंचा प्रत्यक्ष सहवास आणि अकृत्रिम स्नेह लाभल्याची, त्यांच्या



व्यक्तिमत्त्वाचा आवर्जून उल्लेख केला. माधवीताईंच्या सातत्यपूर्ण आणि दर्जेदार लेखनप्रवासाचा आढावा घेणारी एक चित्रफित याप्रसंगी दाखवण्यात आली.

प्रा. छाया पिंगे यांनी 'हिरा ठेवीता ऐरणी' या कादंबरीतील निवडक अंशाचे अभिवाचन केले तर 'कथा मंजिरी' या कथासंग्रहातील 'आब गया आदर गया' या कथेच्या निवडक भागाचे सादरीकरण केले मंजिरी देवरस यांनी.

या विशेष प्रसंगी माधवीताईंना शुभाशीर्वाद व प्रसाद देण्यासाठी सिद्धिविनायक मंदिराचे साधले गुरुजी आवर्जून उपस्थित होते.

कथा, कादंबरी, अनुवाद, चरित्र, अध्यात्मिक, बालसाहित्य, कविता, ललित लेखन अशा साहित्याच्या सर्व क्षेत्रात चौफेर वावरणाऱ्या माधवीताईंनी आजवर मासिकांचे संपादन,



अभिनव उपक्रमाविषयी बोलताना त्यांनी 'मराठी साहित्याची भूमी ओलसर ठेवत नव्या पावलांनाही त्यावर उमटवण्याची जागा निर्माण करण्याची मोलाची कामगिरी" अशा शब्दात माधवीताईंचे विशेष कौतुक केले.

सुप्रसिद्ध साहित्यिका व मौज प्रकाशनाच्या कारकीर्दीचा हा सुवर्णक्षण अनुभवल्याची कृतार्थता सर्वच उपस्थितांच्या मनात काठोकाठ भरलेली होती.

# आमच्या माधवी ताई

बहुप्रसव लेखकाला आपल्या लेखनाचा दर्जा शेवटपर्यंत उत्तम राखता येतोच असे नाही. लोकप्रिय लेखिका माधवी कुंटे यांनी लेखन दर्जा पुस्तकांच्या शंभरी पर्यंत चांगला ठेवला आहे ही बाब म्हणून मला वैशिष्ट्यपूर्ण वाटते आणि त्यांचे कौतुकही वाटते. कधी काही माणसे आपल्या जवळ येतात आणि गोतावळ्यात कधी मिसळून



जातात ते कळत नाही. माधवी ताईंच्या बाबतीत असेच झाले. नक्की वर्ष आठवत नाही, १९९२ साल असावे. स्तंभलेखक चर्चा मंचच्या निमित्ताने ओळख झाली आणि त्याचे स्नेहात कधी रुपांतर झाले ते कळले नाही. मंच बंद झाल्यावर आम्ही पारल्यात पार्ले संवाद नावाचा मंच काढला, त्यानंतर आता पारले साहित्य कट्टा चालू केला. दरम्यान आम्ही काही पुस्तक प्रेमी त्यांच्या घरी गप्पा मारीत होतो. या सगळ्यामधून त्यांच्या लाघवी स्वभावाचे दर्शन सतत घडत गेले.

मला काहीवर्षांपूर्वी दोन साहित्य पुरस्कार एकदम घोषित झाले. त्यांना व त्यांच्या बहिणीला त्याचे इतके कौतुक की, त्यांनी माझा त्यांच्या घरी सत्कार केला परत एकदा साहित्य संघाचा कार्यवाह झाल्यावर आणि साहित्य महामंडळाचा विश्वस्त झाल्यावर उस्फूर्त सत्कार केला. मीही त्यांना साहित्य संघाच्या काही संमेलनात सहभागी करुन घेणे, साहित्य व इतर दिवाळी अंकांसाठी कथा लिहिण्यास सांगणे, त्यांच्या पुस्तकांवर परीक्षणे लिहिणे अशी काही कामे करीत होतो. यामधून आमचे स्नेहसंबंध अधिक दृढ होत गेले. माधवी ताईंचे लेखन वाचन प्रिय तर आहेच तसेच प्रत्येक पुस्तकात त्यांनी वेगळेपण राखले आहे. त्यांच्या शंभर पुस्तकांचे साहित्य प्रकार पाहिले तरी त्याची प्रचिती येते. त्यांनी केवळ लेखनात समाधान न मानता काही वाड.मयीन कार्यही केले आहे. कथा क्लब मधून नवोदित लेखिकांना मार्गदर्शन, अनेक साहित्यिक कार्यक्रम-संमेलनात सहभाग सतत चालू असतो .साहित्यिक गप्पा हे त्यांच्या साठी टॉनिक असावे म्हणून पारले साहित्य कट्ट्यावरील गप्पाना त्या आवर्जून येतात आणि आम्हा पुस्तक प्रेमींचा आनंद द्विगुणित करतात.



**अशोक बेंडखळे**
९८६९२५८५८५

## पार्ल्यातील वृक्षवैविध्य

# फर्नट्री

आज आपण बघणार आहोत एक तसा तुरळकच सापडणारा पण पार्ल्यात दोन ठिकाणी आढळलेला एक वृक्ष.

हा आहे Filicium decipiens. Family Sapindaceae. Ferntree फर्नट्री (मराठीमधे नांव आढळलेले नाही)




पाने दिसण्यात नेच्याच्या(Fern) पानांसारखी म्हणून हे नांव आले असावे. हा पूर्व आफ्रिका, मदागास्कर, भारत, श्रीलंका, इंडोनेशिया हवाई बेटे ह्या भूप्रदेशांत आढळून येतो. सर्वसाधारणपणे शोभेसाठी म्हणून हा लावला जातो.

खोड सरळ वाढणारे, फिकट रंगाचे असते. पाने चकचकीत असतात. फुले अगदी लहान व सहज न दिसतील अशी पर्णसंभारा आड लपलेली असतात. फळे लहान, गोलाकार व घोसात असतात. कच्ची असताना हिरवी असणारी फळे पिकल्यावर जांभळी होतात. अखाद्य असतात. पानांचा अर्क जंतुघ्न (Antibacterial), दाह शमवणारा (Anti inflammatory), असून



कर्करोग आणि मधुमेहावरील उपचारांमुळे वापरला जातो.

हा तसा देखणा दिसणारा वृक्ष विलेपार्ल्यात जय-हनूमान सोसायटीतील इमारत क्रमांक चारच्या कोपऱ्यावर तसेच श्रद्धानंद रस्त्याच्या पश्चिमेस मखारिया हाऊस नावाच्या इमारती समोर आहे.



**श्रीकांत सावरकर**
९२२३३१४९०९




**तुमच्या हॉलिडेवर घ्या काही भन्नाट अनुभव :**

- भारतात किंवा परदेशात एखाद्या राजवाड्यात वास्तव्य
- सिटी सेंटर लोकेशन्स असलेली लक्झरी हॉटेल्स
- दुबईमध्ये गोल्ड कॅपुचिनो पिण्याचा अनुभव
- थायलंडमध्ये प्रायव्हेट यॉट मधून सेलिंग
- केनियामध्ये हॉट एअर बलून सफारी
- ऑस्ट्रेलियामध्ये हेलिकॉप्टर आणि सी प्लेन राइड्स
- इटलीमध्ये फेरारी राईड

आणखी बरंच काही...

तुमचं ड्रीम डेस्टिनेशन, तुमच्या ट्रॅव्हल डेट्स, हॉलिडेसाठी तुमचा प्रेफर्ड कालावधी, तुमच्या हॉटेल्सच्या आणि जेवणाच्या आवडीनिवडी, इकॉनॉमी/बिझनेस/फर्स्ट क्लासपैकी तुम्हाला हवा असलेला विमानप्रवास आणि तुमचं बजेट सुध्दा. आम्हाला फक्त हे सगळं कळवा आणि आमची टीम तुमच्यासाठी डिझाईन करून देईल तुमचा एक परफेक्ट प्रायव्हेट हॉलिडे. जमवा तुमचा फॅमिली ग्रुप किंवा फ्रेंड्स ग्रुप आणि वीणा वर्ल्डसोबत करा तुमचा एक्सक्लुसिव्ह हॉलिडे. आपल्या NRI पर्यटकांसाठी खास इंडिया इनबाउंड हॉलिडेज सुद्धा उपलब्ध.



**युरोप बाय रेल**
नॉर्वे इन अ नटशेल (5D) ₹ 1,50,000
स्विस पॅरिस (8D) ₹ 1,85,000
स्वित्झर्लंड विथ ग्लेशियर एक्सप्रेस (8D) ₹ 2,50,000

**युरोप बाय व्हॅन**
प्राग व्हिएन्ना बुडापेस्ट व्हॅन टूर (7D) ₹ 2,20,000
लक्झरी इंग्लंड स्कॉटलंड व्हॅन टूर
12 Days - ₹ 7,81,000

**फॅमिली थीम पार्क स्टेज**
दुबई विथ अबू धाबी (6D) ₹ 70,000
पॅरिस विथ डिस्नेलँड स्टे (6D) ₹ 1,05,000
सिंगापूर विथ सेंटोसा स्टे (6D) ₹ 1,08,000

**रोमँटिक गेटअव्हेज**
बेस्ट ऑफ फुकेत अँड क्राबी (8D) ₹ 41,000
बाली विथ पूल व्हिला स्टे (6D) ₹ 45,000
ब्रिस्बेन विथ हॅमिल्टन आयलंड (8D) ₹ 1,00,000

**सेल्फ-ड्राईव्ह हॉलिडेज**
गो बियाँड मेलबर्न – सेल्फ ड्राईव्ह (5D) ₹ 92000
बेस्ट ऑफ न्यूझीलंड – सेल्फ ड्राईव्ह
14 Days - ₹ 2,25,000

**एनआरआय (NRI) हॉलिडेज**
जयपूर रणथंबोर (5D) ₹ 35,000
वाराणसी अयोध्या (8D) ₹ 38,000
केरला विथ CGH अर्थ हाऊसबोट (8D) ₹ 90000

**veenaworld.com • Call: 1800 22 7979 • Mon-Sat 10 to 7 • travel@veenaworld.com**
**Vile Parle: Sun-Vision Classic, Hanuman Road, Vile Parle (E), Mumbai 400057. Call: 887 997 2213**

Holiday price is per person on twin sharing basis and includes accommodation, meals, sightseeing, and transfers. Holiday prices exclude airfare and visa fees. Travel insurance* included in India holidays. Prevailing forex rates apply on the day of booking for international holidays. Since airfares are not included in the holidays, guests can opt for Economy/Business/First class air travel as per their choice and preference. Govt. taxes extra. T&C apply.

VEENA WORLD
Travel. Explore. Celebrate Life.

# आदरणीय माधवीताई, मन भरून शुभेच्छा...!

आपली पुस्तक सेंचुरी साजरी होत आहे याचा मला अतिशय आनंद होत आहे. आपल्या स्वप्नपूर्तीचे आम्ही सर्व साक्षीदार आहोत याचा खरंच मला स्वत:ला हेवा वाटत आहे कारण या प्रदीर्घ वाटचालीचा मी एक छोटासा हिस्सा आहे. शंभर पैकी दहा पुस्तक मी प्रकाशित केले आहेत त्या प्रवासात लाभलेला तुमचा सहवास. आपल्यासारख्या मोठ्या सिद्ध असतं लेखिकेची पुस्तक काढणं नेहमीच कोणत्याही प्रकाशकाला अभिमानाचे असते. शंभर पुस्तक आणि तेही दर्जेदार असे विषयाने परिपूर्ण असलेली.. साहित्यातील जवळजवळ सर्वच प्रकार तुम्ही लिहिले आहेत कोणताही साहित्यप्रकार तुम्हाला वर्ज नाही. खरं सांगू... हे यश तुमच्या कष्टाचं बुद्धीच जिद्दीचं फलित आहे.

मला आजही आठवते ती, तुमची पहिली भेट. नुकतीच मी पार्ल्यात राहायला आले होते आपण आणि चारुशीला ओक दोघींनी मिळून कथालेखन कार्यशाळेचे आयोजन केले होते. त्या कार्यशाळेमध्ये तुम्ही मार्गदर्शन केलं ते मी ऐकलं आणि तुमची फॅन झाले. पुढे मी चेरीलँड नावाचं बालमासिक सुरू केलं त्यामध्ये प्रत्येक महिन्याला तुमची एक बालकथा असायची. त्या प्रवासात तुमचं बोट पकडलं; पण साहित्याची वाटचाल सुरू झाली. पुढे प्रकाशन व्यवसाय सुरू केला आणि तुमची काही कवितासंग्रह व बालसाहित्याची पुस्तकं प्रकाशित केली. या वेळेला आपल्याशी झालेल्या भेटीगाठी त्यातून सुसंवाद वाढत गेला. एकदा तुम्ही म्हणालात, 'तुला पाहिलं की मला माझ्या छोट्या बहिणीची आठवण येते. त्याच वेळेला आपल्यामध्ये लेखिका प्रकाशिके पलीकडचं नातं निर्माण झालं ते म्हणजे, बहिणींचं नातं ते आजही टिकून आहे.



गेली पंधरा वर्षे तुमच्या सहवासात राहून तुमच्यातील नम्रता, उदारता, संयम, दुसऱ्याला भरभरून देण्याची तुमची वृत्ती, परमेश्वरावर नितांत श्रद्धा आणि स्वत:वर असलेला विश्वास या गोष्टी नकळत तुमच्याकडून मी घेतल्या. कायमच मोठ्या बहिणीची भूमिका तुम्ही निभावत आला आहात याची मला जाणीव आहे.

माझ्या लेखन प्रवासात तुमचा असलेला सिंहाचा वाटा मी कधीही विसरणार नाही.

गेली ५० वर्षं आपली लेखणी सराईतपणे चालली आणि मराठी साहित्य विश्वात आपण मोलाची भर घातली. अख्या महाराष्ट्रातच नाही तर महाराष्ट्राच्या बाहेरही आपले वाचन आपण निर्माण केले. कथा, कादंबरी, वैचारिक, कविता, बाल साहित्य, ओशोचे तत्वज्ञान, लेखसंग्रह अशा विविध साहित्य प्रकारात आपण मुशाफिरी करून आपल्या नावाची वेगळी मोहोर उमटवली.

आपण झोकून देऊन साहित्याची नितांत सेवा केली आहे तसेच कायमच मदतीचा हात पुढे करून आपण अनेक नवोदित लेखक घडविले आहेत. हे मी जवळून पाहिलं आहे.

तुमचे आशीर्वाद, शुभेच्छा मला सदैव प्रेरणा देत राहतात. यानिमित्ताने ताई मी एवढेच म्हणे तुम्हाला ईश्वर कृपेने उत्तम आरोग्य लाभो. आणि साहित्याचा हा खळखळता प्रवाह वृद्धिंगत हो हीच सदिच्छा...!



**लता गुठे**
९८७०६१७१२४

# विलेपार्ले स्थानकामध्ये Escalator ची गरज

पश्चिम रेल्वेच्या मुंबईस्थीत विलेपार्ले रेल्वे स्थानक येथे पूर्व व पश्चिम बाजुकडून रेल्वे फलाटांवर प्रवेश करण्यासाठी उदवाहनांची (Lift) अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे आजारी व ज्येष्ठ नागरिकांची सोय होईल तसेच या स्थानकावरील क्र.१ व २ च्या फलाटांवर सरकत्या जिन्याची (Escalator) सोय करण्यात यावी. इतरत्र अनेक लहान रेल्वे स्थानकांवर अशा सोयी आहेत सबब येथेही अत्यंत आवश्यक आहेत. विलेपार्ले येथील सर्व नागरिकांच्या सोयीसाठी लोकप्रतिनिधींनी यात पुढाकार घेऊन त्वरित लक्ष घालावे ही विनंती.



# आपलंसं करणाऱ्या माधवी ताई

माधवीताईचा आणि माझा गेल्या किती वर्षाचा परिचय आहे याचा हिशोब करायला गेलो आणि एक गोष्ट लक्षात आली. अमुक अमुक इतकी इतकी वर्ष असा आकडा डोक्यात येईना सारखं वाटत होतं की अरे आपण यांना



ओळखतोच. अगदी सुरूवातीपासूनच त्यांचं सोपं कारण असं आहे की त्यांच्याशी असलेला स्नेह सगळ्या आकडेवाऱ्यांच्या पलीकडे गेलाय. वर्षाची आकडेवारी लांबी मोजते, खोली नाही. टिळक मंदिराच्या बालक पालक मार्गदर्शन केंद्राच्या कार्यवाह म्हणून त्यांनी सहा वर्ष जबाबदारी पाहिली. मी या केंद्रात मानद मानसोपचारतज्ज्ञ म्हणून काम करत होतो. या सहा वर्षात आमचा स्नेह दृढ झाला आणि तो खोलवर वाढतच गेला. 'माझं पण बी. ए. ला सायकॉलॉजी होतं' हे मला घाबरवणारं वाक्य मी एकदाही त्यांच्या तोंडून ऐकलं नाही (घाबरवणारं अशासाठी की त्यातला गर्भितार्थ- मलाही मुलांचं मानसशास्त्र कळतं बरं का. तुम्हालाच नाही. मी सांगते तुम्हाला काय करायचं ते!) कुठल्याही उपक्रमांबद्दल त्यांच्याशी चर्चा करताना मला त्यांच्या मनाचा खुलेपणा कायम जाणवत राहिला. नवीन संकल्पना समजून घेताना त्यांच्यातली जिज्ञासू वृत्तीच दिसत राहिली. विविध विषयांवर आम्ही केलेले अनेक कार्यक्रम यशस्वी झाले . त्यात त्यांच्या पाठिंब्याचं बळ होतं हे विशेष. त्यांनी ते पद सोडल्यानंतरही आमचा मधून मधून संपर्क चालू राहिला मी काहीबाही लिहिलेलं छापून आलं तर आजही त्यांचा प्रोत्साहनपर फोन असतो एका यशस्वी लेखिकेचं हे प्रोत्साहन मला पुष्टी देऊन जातं. त्यांचा हसतमुख चेहरा हे त्यांच्या निर्मळ मनाचं 'फंट डेस्क' आहे. शारीरिक वयानुसार ते कमी झालेलं नाही नुकत्याच त्यांच्या शंभराव्या पुस्तक विमोचनाच्या कार्यक्रमातही ते जाणवलंच त्यांच्या हातून असंच निरंतर लिखाण होत राहो आणि त्या माणसांशी जोडलेल्या राहोत ही सदिच्छा.



**डॉ. मनोज भाटवडेकर**
९८१९४९९४०८




अमृतधारा
हाऊसिंग कॉम्प्लेक्स
2 BHK HOMES
आकर्षक घर घ्या,
आकर्षक मुहूर्तावर
25+ ॲमेनिटीज
3 लाखांची बचत!
रवि महाजन बिल्डर्स अँड डेव्हलपर्स सादर करीत आहेत बदलत्या नाशिक शहरातील भव्य दिव्य गृहप्रकल्प 'अमृतधारा'!
25 पेक्षा अधिक ॲमेनिटीज असणाऱ्या ह्या गृहप्रकल्पात आहेत तुमच्या मनाला भावतील व तुमच्या बजेट मध्येही बसतील अशी सुनियोजित 2 बी.एच.के. घरे. तेव्हा आजच अमृतधाराला भेट द्या आणि लगेच बुक करा तुमच्या सुखाचा पत्ता.
ELEGANT+ 40.50 L*
CLASSIC 43.13 L*
LUXURIA 50.80 L*
ही किंमत मर्यादित कालावधीसाठी
सोबत आनंद देणाऱ्या 25+ ॲमेनिटीज
स्विमिंग पूल
क्लब हाऊस
मल्टिपर्पज कोर्ट
डिझायनर लॉबी
ॲम्फिथिएटर
नेट क्रिकेट
चिल्ड्रन्स प्ले एरिया
पार्टी लॉन
ग्रीन जिम
गेटेड कम्युनिटी
सिक्युरीटी
साईट : सर्वे. नं. 82, राजसारथी सोसायटी जवळ, इंदिरानगर, नाशिक | 7304 7304 83
RAVI MAHAJAN
BUILDERS & DEVELOPERS
सुख समृद्धीच्या चार भिंती, प्रत्येकासाठी
www.ravimahajan.com
ऑफिस : 113 ते 116,
द प्रेसिडेन्सी, जुना आग्रा रोड,
गडकरी चौक, कालिका मंदिर
जवळ, नाशिक - 2.
Project approved by
SBI
HDFC HOME LOANS
ICICI Bank Home Loans
Bank of Baroda
Member of CREDAI NASHIK METRO
P51600034501
P51600034278

# अशी ही माधवी

दिनांक २३ मार्च २०२४. लोकमान्य सेवा संघ विलेपार्ले येथे ख्यातनाम, जेष्ठ साहित्तिका श्रीमती माधवी कुंटे यांच्या शंभराव्या पुस्तकाच्या प्रकाशनाचा कार्यक्रम त्यांनी आयोजित केला होता.



माधवी ताईंच्या, 'कथा मंजिरी" ह्या कथा संग्रहाचा, तसेच शंभरावे पुस्तक म्हणून "हिरा ठेविता ऐरणी" ह्या कादंबरीचा हा प्रकाशन सोहळा सर्वार्थिने विशेष आणी दिमाखदार झाला. विविध क्षेत्रातील मान्यवर, लेखक, साहित्यप्रेमी, वाचक, मोठ्या उत्साहात उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा सुप्रसिध्द विनोदी लेखिका मंगला गोडबोले होत्या आणी प्रमुख पाहुण्या होत्या ख्यातनाम लेखिका, संपादिका श्रीमती मोनिका गजेंन्द्रगडकर. पार्ल्याचे लोकप्रीय आमदार श्री पराग अळवणीची खास उपस्थिती होती.

परागजींच्या मनोगतात ते म्हणाले की माधवी ताई बद्दल वाटणारा आदर म्हणून आज इतके लोक आले आहेत. आजच्या प्रकाशन सोहळ्यामुळे पार्ल्याचा गौरव वाढला आहे.

श्रीमती मोनिका गजेंन्द्रगडकरानी भाषणाच्या सुरवातीलाच "मी माधवी ताई बद्दलचा हेवा व्यक्त करते." असं म्हणत त्यांच्या लेखन सिध्दीचं कौतूक केलं. माधवी ताईंनी सर्जनशील शब्दातून माणसं जोडली. नवकथा बहराला आली तो काळ संपलेला असताना नव्व्याण्णावं पुस्तक म्हणून कथा संग्रह प्रकाशित होणं ही अत्यंत आनन्दाची गोष्ट आहे. "सांगायला सोपी गोष्ट म्हणजे कथा नव्हे तर, रक्त पणाला लावणे म्हणजे कथा!" असं म्हणत त्यांनी कथा या लेखन प्रकारा बद्दल तसंच माधवी ताईंच्या कथा संग्रहा बद्दल मनोगत व्यक्त केलं.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा मंगला गोडबोले विनोदी शैलीत, अत्यंत आपुलकीने मनापासून बोलल्या. "शब्द या माध्यमाच्या सर्व शक्यता माधवी ताईंनी आजमावल्या. त्यांचा त्यांच्या शब्दावर विश्वास असल्यानेच त्या हे करू शकल्या. भाषेच्या बंधनात न अडकता त्या अनेक व्यक्तींशी संवाद करत राहिल्या. लेखिका आणी व्यक्तिगत आयुष्य याचा समतोल सांभाळत त्या लिहीत राहिल्या. माधवी ताई या जमिनीत ओलावा टिकवून ठेवणा-या वृक्षा सारख्या असल्यानेच कथाक्लब सारखे उपक्रम राबवत त्या नवोदिताना लेखनासाठी मार्गदर्शक ठरल्या." माधवी ताई बद्दलचे मंगला गोडबोले यांचे हे गौरवोद्गार विशेष लक्षात राहिले.

या कार्यक्रमाच्या अनुषंगाने मला माझी आणी माधवी ताईंची पहिली भेट आठवली. त्या माझ्या घराच्या अगदी जवळ रहातात. अेक जेष्ठ लेखिका म्हणून मी माधवी ताईंना भेटायला त्यांच्या घरी गेले होते. पहिल्या भेटीतच त्यांच शांत, समजुतदार आणी आश्वासक व्यक्तिमत्व खूप भावलं. त्यांच लिखाण, बोलणं आणी सहवास यातून त्यांच्या विविध विषयातील वाचनाचा, अभ्यासाचा, अनुभवाचा आणी संवेदनशीलतेचा अंदाजही करणं माझ्या क्षमतेच्या पलीकडे असल्याचं लक्षात आलं. असं असुनही माधवी ताई आपली मोठी बहीण, मावशी, मैत्रीण असाव्यात अशा आपुलकीने सहजतेने वागतात. त्यांच्या बरोबर धमाल मस्ती करत मी त्यांना "लव्ह यू" म्हणत मिठी मारू शकते.

शंभराव्या पुस्तका नन्तरही "मी कृतार्थ झाले" असं न म्हणता "मला आनन्द झाला" असं म्हणत त्यांची साहित्य सेवा होतच रहाणार आहे. माधवीताई तुम्हाला विनम्र अभिवादन आणी नेहमीं म्हणते तसं "लव्ह यू..."



चारुलता काळे
९८२१८०६८३७

Prakash Gorule
8655476884

॥ श्री विरोबा प्रसन्न ॥
॥ श्री कुलस्वामिनी प्रसन्न ॥

Ganesh : 8097308878
: 9372086303
Sudhir : 9082627960



PRAKASH TRANSPORT

Packers & Movers
All Over Maharashtra Service
Also Loading & Unloading

C-1, Ground Floor, Bhagirathi Smruti, Subhash Road,
Vile Parle East, Mumbai - 400057.

# 'माधवीताई' एक जिव्हाळ्याचं नातं

'श्रीमती माधवी कुंटे या नावाच्या एक प्रसिद्ध आणि वाचकप्रिय साहित्यिका आपल्या पार्ल्यात राहतात.' या पंधरा वर्षांपूर्वीच्या सर्वसाधारण ओळखीपासून 'आमच्या माधवीताई' या जिव्हाळ्याच्या नात्यापर्यंतचा प्रवास लक्षात घ्यायचा तर माधवीताईंबरोबर घालवलेले असंख्य क्षण डोळ्यांपुढून सरकत जातात. माझा त्यांच्याशी पहिला परिचय झाला तो कथाक्लबच्या माध्यमातून.



१९ जून २०१० या दिवशी डॉ.चारुशीला ओक यांनी माधवीताईंच्या साथीने कथाक्लब सुरू केला. वाचनाची आवड आणि लेखनाकडे कल असणाऱ्या आम्ही बारा-पंधराजणी त्यात उत्साहाने सहभागी झालो. चारुशीलाताई आणि माधवीताई या दोघींनी साहित्याच्या क्षेत्रात तोवर आपला जम बसवलेला होता. विशेषत: माधवीताईंच्या लेखनाचा तर तो ऐन बहराचा काळ होता.

'मी एक खलाशी' या माधवीताईंच्या पहिल्याच कादंबरीला साक्षात कुसुमाग्रजांची दाद मिळाली होती. त्यानंतरही स्त्री लेखिकांकडून अभावानेच प्रकट होणाऱ्या चौकटीबाहेरच्या जगाचं चित्रण करणाऱ्या त्यांच्या कादंबऱ्यांना वाचकांनी उत्तम प्रतिसाद दिला. स्त्रीमनाचे नानाविध कंगोरे प्रकट करणाऱ्या सहजसुंदर आणि प्रवाही कथा त्या सातत्याने लिहित गेल्या. विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलं. मानसशास्त्राचा अभ्यास आणि अध्यात्माची ओढ त्यांच्या लिखाणातून सहज प्रकट होत गेली. सकारात्मक विचारांचा मागोवा घेणाऱ्या पुस्तकांबरोबरच माधवीताईंनी ओशोंचं धर्मापलिकडचं तत्त्वज्ञान, वेद राही यांच्या उत्तम हिंदी कथा हेदेखील अतिशय सोप्या भाषेत मराठीत आणलं. लहान मुलांसाठी चरित्रमालिका लिहिल्या, नाटकं लिहिली. चित्रपटांसाठी पटकथा लिहिल्या. आकाशवाणी, दूरदर्शनवरून अनेक लोकप्रिय कार्यक्रम सादर केले. अशी सातत्याने दर्जेदार साहित्यनिर्मिती करणाऱ्या माधवीताईंनी आज पुस्तकांची शतकपूर्ती केली आहे ही किती अभिमानाची गोष्ट आहे!


माधवीताईंचा हा विलक्षण लेखनप्रवास पाहिला तर कोणाचीही छाती दडपून जाईल. पण त्यांच्या परिचयातील कोणीही हेच सांगेल की एवढी विपुल साहित्यनिर्मिती करतानाही त्या कधीही आपल्या कोशात बंदिस्त राहिल्या नाहीत. अध्यापन, पत्रकारिता, संपादन अशा विविध जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळताना साहित्याशी निगडित अनेक संस्थांमधून तसेच सामाजिक संस्थांमधूनही त्यांचा नेहमीच सक्रीय सहभाग राहिलेला आहे.

आज विचार केल्यावर प्रकर्षाने जाणवतं की माधवीताईंसारख्या प्रथितयश लेखिकेने आमच्यासारख्या धडपडणाऱ्या नवोदितांना वेळ देणं, लिहिण्यासाठी प्रोत्साहन देणं, पावलोपावली मार्गदर्शन करणं ही किती मोठी गोष्ट आहे! आमचं कच्चं लेखनही त्या वाचून घेत, त्यावर चर्चा करत, त्यातल्या काही भागांचं पुनर्लेखन करायला लावत. नवीन विषयांचं, वेगळ्या प्रयोगांचं नेहमीच स्वागत करत. आमच्या लेखनात हळूहळू सुधारणा व्हायला लागल्यावर काही मासिकांच्या संपादकांकडे शब्द टाकून त्यांनी आमच्या निवडक कथांना प्रसिद्धी मिळवून दिली. आमच्यापैकी जवळपास प्रत्येकीचा किमान एक स्वतंत्र कथासंग्रह प्रकाशित झालेला आहे. अनेकजणींना विविध पुरस्कार मिळाले आहेत. विनोदी कथा, गूढकथा, कादंबरी, ललितलेखन, माहितीपर लेखन, कविता असे वेगवेगळे लेखनप्रकार आमच्या कथा क्लबमधल्या लेखिका समर्थपणे हाताळत आहेत. हा आत्मविश्वास आम्हाला मिळाला तो केवळ चारुशीलाताई आणि माधवीताईंमुळे. चारुशीलाताईंच्या पश्चात माधवीताईंनी एकट्याने ती जबाबदारी अतिशय मायेने पेललेली आहे.

इतक्या वर्षांत आमचं माधवीताईंबरोबरचं नातंही अधिक परिपक्व आणि अनौपचारिक झालंय. कुठल्याही वेळी हक्काने हाक मारावी, सुखदु:खाच्या गोष्टी बोलाव्या, मन मोकळं करावं इतकं ते जवळचं, मैत्रीपूर्ण झालंय.

गेल्या काही वर्षात तर माधवीताईंच्या लोभस व्यक्तिमत्त्वातल्या उत्साही, चिरतरुण पैलूचीही ओळख अनेकदा होत गेली. 'आमच्या काळी असं नव्हतं...' वगैरे भाषा त्यांच्या तोंडी कधीच ऐकू येत नाही. आवडीनिवडी, पेहराव, गप्पांचे विषय, तंत्रज्ञानाचा वापर ह्या सगळ्याच बाबतीत त्या खूप लवचिक आणि आधुनिक आहेत. बदलत्या काळाबरोबर त्यांनी आपलं संपूर्ण लेखन लॅपटॉपवर करायला सुरुवात केली आहे. सोशल मिडियाचा उपयोग अतिशय उत्तम प्रकारे करून त्या सर्वांशी संपर्क ठेवून आहेत. आजही त्यांनी गच्चीवरून मोबाईलच्या कॅमेऱ्यात टिपलेले सूर्योदयाचे अद्भूत रंग आणि ते सौंदर्य शब्दांत साठवणाऱ्या नव्या कवितेच्या प्रसन्न ओळींनी आमचा एखादा दिवस सुरू होतो.

आम्हा सर्वांना समृद्ध करणारा माधवीताईंचा हा सर्जनशील ताजेपणा असाच अबाधित राहो ही सदिच्छा!




**चित्रा वाघ**
९८२११ १६९३६

# खिशांत फक्त ७ डॉलर......

एक पार्ले टिळक विद्यालयातला १३ वर्षाचा मराठी मुलगा..१९६४ मध्ये इंडियन एक्सप्रेस मधला US प्रेसिडेंट जॉन्सन ह्यांचा निवडून आल्यानंतरचा फोटो बघतो आणि चित्रकलेची आवड असल्यामुळे त्यांचे स्केच काढून पत्ता वगैरे काही माहित नसताना वॉशिंगटन डिसी ला त्यांच्या नावानी, दिवाळी ग्रिटींग कार्ड आणि अभिनंदनाचे पत्र पाठवून देतो आणि २ महिन्यांनी अमेरिकन सल्लागारातून चक्क कौतुकाचे आणि धन्यवादाचे पत्र त्याला पोस्टाने येते.

पार्ल्याचे रामानंद मधले रहिवाशी संजय चापेकर ह्यांचा अमेरिकेशी असा पहिला संबंध आला.आज त्यांची ओळख करून घेऊया.

१९६६ मध्ये 'साऊंड ऑफ म्युझिक'



पिक्चर च्या पोस्टर ची आऊट लाईन दिली असता, चित्र रंगविण्याच्या स्पर्धेत त्यांना बक्षिस मिळालं होतं. चित्रकला चांगली असताना, १९६७ मध्ये ११ वी नंतर आर्टस् ला न जाता, आर्ट आणि तांत्रिक ज्ञान असलेल्या वास्तूकलेचे शिक्षण त्यांनी बान्द्रा येथील कॉलेज मधून घेतले.

त्यावेळी त्यांना भारतीय पोस्ट खात्यातून स्कॉलरशिप मिळाली. कॉलेमध्ये असताना त्यांना स्थापत्यशास्त्र व इंटिरियरडिझाइनमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल २ मेडल्स मिळाले.


२६ ऑक्टोबर १९६९ मध्ये चंद्रावर पाऊल ठेवणारे अपोलो ११ चे अंतराळवीर मुंबईत आले होते . त्यांच्यासाठी १८" / २४" पेपरवर, एक सुरेख चित्र काढून आणि एक कविता लिहून ते ग्रिटींग त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी संजय ह्यांनी प्रयत्न केले. पण सिक्युरिटीच्या कारणांमुळे ते देता आले नाही. नंतर त्यांच्या वडिलांनी ओळखीच्या कोणा मार्फत तरी ते अंतराळवीरांपर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था केली. नंतर संजय ह्यांना अंतराळवीरांकडून पत्र आले होते. काही वर्षांनी संजय जेव्हा अमेरिकेत पोहोचले तेव्हा त्यांना कळले कि त्यांचे ते चित्र आणि कविता ह्यूस्टन , टेक्सास येथील जॉन्सन स्पेस सेंटर मध्ये प्रदर्शनिय भागात ठेवले होते. ही गोष्ट त्या काळी किती कौतुकाची होती !

वास्तुशास्त्राचा हा कोर्स ५ वर्षाचा असला तरी तो डिप्लोमा होता. नंतर १९७३ मध्ये त्यांना मास्टर्स डिग्री (Environic design मध्ये) करण्यासाठी University of Norte Dame Indiana मध्ये प्रवेश मिळाला.

आर्थिक मदत मिळवण्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी प्रयत्न केले. २९ जुलै ७३ च्या महाराष्ट्र टाईम्सच्या पेपरमध्ये J.N.Tata Endowment कडून, भारतातल्या फक्त ३० जणांना स्कॉलरशिप मिळालेल्यांची यादी होती. त्यात संजय चापेकरांचे नांव होते. कॉलेजच्या शेवटच्या वर्षात चापेकरांनी एक प्रोजेक्ट केले होते. मुंबईमधील इंटरनॅशनल एअरपोर्ट पॅसेंजर टर्मिनल बद्दल ती ड्रॉईंग्ज चापेकरांनी J.R.D. Tata ह्यांच्या ऑफिसमध्ये पाठवली होती. त्याचे त्यांनी कौतुक केले होते, आणि त्याचा फायदा स्कॉलरशिप मिळवतांना नक्कीच झाला होता.

७३ साली फक्त ७ डॉलर खिशात घेऊन ते अमेरिकेत गेले होते. अनेक कष्ट करून त्यांनी तिथे यश मिळवलेच पण ज्या कॉलेमधून त्यांनी डिग्री घेतली त्या वास्तुशास्त्राच्या कॉलेजमध्ये त्यांनी ५० वर्षांनंतर एक फेलोशिप स्वत: सुरू केली.

या पन्नास वर्षात त्यांनी अनेक परिक्षा दिल्या, कोर्सेस केले. अमेरिकेतल्या ५० स्टेट्सच्या ठिकाणी स्वतंत्र व्यवसाय करता येण्यासाठी दिलेली परिक्षा ही (NCARB), आणि मिळालेले प्रशस्तिपत्रक .. ही त्यांची मोठी मानाची कामगिरी होती !




त्यानंतरच्या वर्षी त्यांनी LEED (Leadership in Energy and Environmental Design) ही परिक्षा देऊन प्राविण्य मिळवलं. त्यांनी केलेल्या डिझाईनला सिल्व्हर आणि प्लॅटिनम सर्टिफिकेट मिळालं ही गोष्ट ही मोठी होती.

फोटोग्राफी आणि वास्तुशास्त्र ह्यात त्यांना अनेक बक्षिसे मिळाली आहेत. ह्या विषयांच्या मासिकांतर्फे स्पर्धा होतात, त्यात ते नेहमी भाग घेत असतात. कारण तो त्यांचा छंदच आहे.

त्यांनी अनेक विविध प्रकारच्या बिल्डिंग्जची



डिझाईन्स केली. शहरातल्या, जवळच्या ठिकाणाच्या विकासासाठी करण्यात येणाऱ्या



प्लॅनिंगसाठी त्यांनी काम केले आहे.

वेगवेगळ्या कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांचे मुल्यमापन करण्यासाठी , परिक्षक म्हणून त्यांना नेहमी बोलाविण्यात येते. फोटोग्राफी बरोबरच खगोलशास्त्र , कविता करणे, सायकलिंग करणे, रिस्टवॉच च्या डायलची डिझाईन्स करणे हे त्यांचे छंद आहेत .

एका दिवसांत १०० मैल सायकल चालविण्याच्या स्पर्धेत (Reston century) त्यांनी दोनदा भाग घेतला होता. त्यांच्या फोटोग्राफी चे , महत्वाच्या बिल्डिंग्जचे फोटो ..

संजय ह्यांच्या पत्नी मृणाल ह्यांनी Biochemistry मध्ये PhD केली होती. त्यांनी पोस्टडॉक्टरल फेलो म्हणून जिथे रिसर्च करायला मिळाला अशा NIH, FDA, NIST बरोबर काम केले. त्यांनी रिसर्चर , मॅनेजर , रिव्ह्यूअर म्हणून गव्हर्नमेंट, शैक्षणिक , औद्योगिक क्षेत्रात काम केले. त्यांचे २५ रिसर्च पेपर्स आहेत आणि त्यांनी ४० च्यावर प्रेझेंटेशन्स दिली आहेत. त्यांचे USA मधल्या पहिल्या १० सायन्टिस्ट मध्ये नांव आहे. त्यांचे अनेक सत्कार झाले आहेत. त्या कॅन्सर वर रिसर्च करत होत्या. परंतु दुर्दैवाने त्यांनाच असाध्य व क्वचितच आढळणारा कॅन्सर झाला . त्यातून त्या वाचू शकल्या नाहीत . पण त्यांचे विज्ञाना बद्दलचे प्रेम व कायम शिकण्याची जिद्द त्यांनी आजारपणात ही कायम ठेवली होती .त्यांच्या या स्फूर्तिदायी वर्तनाची आठवण कायम रहावी म्हणून त्यांच्या स्मरणार्थ संजय ह्यांनी Harper cancer research Institute at the University of Notre Dame मध्ये



फेलोशिप सुरू केली आहे.

संजय ह्यांचे वडिल शंभू चापेकर ह्यांनीही अमेरिकेत रहात असतांना एक विशेष कामगिरी केली होती . ते मुंबईत पोस्टमास्तर होते . त्यांना चित्रकलेची अतिशय आवड होती आणि ते उत्तम चित्रकार होते.पण त्यांना प्रतिकूल परिस्थितीमुळे जे.जे. स्कूल ऑफ आर्ट मध्ये जाऊन शिक्षण घेता आले नाही. पण ते सतत चित्र काढत असत.घरातल्या भिंती असोत वा इनलॅंड लेटर असो .त्यावर त्यांना चित्र काढल्या शिवाय चैन पडत नसे. भिंग घेऊन अतिशय बारीक पण सुरेख अक्षरांत इनलॅंड लेटरवर ते अनेकांना पत्र लिहीत आणि छोटेसे, छोट्या छोट्या बारकाव्यानिशी कोपऱ्यात एक चित्र काढत असत. अमेरिकेत Frostburg, Meryland इथे १९९१ मध्ये स्वामी चिन्मय मिशनचे वार्षिक संमेलन होते. त्यासाठी त्यांनी मोठे पेंटिंग केले होते. आधी पेन्सिलने छोटे स्केच केले. मग घरी ४'/८'अशा लाकडाच्या १२ भागांवर ते काढून , नंतर ऑईल पेन्टने ते रंगवून , नंतर घरापासून ३ तास लांब असलेल्या Frostburg या ठिकाणी नेले व स्टेजच्या मागे लावले .अजूनही ते तिथल्या सभागृहात कायमचे ठेवलेले आहे. ही खूपच अभिमानाची गोष्ट आहे. त्यांच्या आई सुध्दा तिथे स्वस्थ न बसता , सतत क्रोशाचे विणत असतं, इतरांना शिकवत असत, तिथल्या लायब्ररीत , नातवाच्या शाळेत मदतनीस म्हणून जात असत.

संजय ह्यांनी वडिलांच्या स्मरणार्थ ते शिकत असलेल्या नांदगाव येथील शाळेत देणगी दिलीच पण त्यांच्या नावाने Notre Dame येथे आर्ट डिपार्टमेण्ट मध्ये स्कॉलरशिप सुरु केली आहे. त्यामुळे Marshall स्कॉलर म्हणून निवडलेली मुलगी ब्रिटन मध्ये २ वर्षे मास्टर्स डिग्री करता गेली आहे. ही स्कॉलर शिप मानाची मानली जाते.

संजय चापेकरांचे चिरंजीव विराज IT क्षेत्रात डबल ग्रॅज्युएट असून मोठ्या कंपनीत



कार्यरत आहेत. असे हे चापेकर कुटूंब.. प्रसिध्दीच्या मागे न लागता आपले कार्य, कलाकारी, दानत्व करत अमेरिकेत त्यांनी आपला ठसा उमटवला आहे. पार्लेकरांना हे समजल्यावर त्यांचे कौतुक तर सर्व करतीलच पण त्यांचा आदर्श समोर ठेऊन संजय चापेकरांना पुढील आयुष्यासाठी मनोमन शुभेच्छा देतील , यांत काही शंकाच नाही.



चित्रा मेहेंदळे
camehendale@gmail.com

# World of Mobile Applications

A few days back one of my relatives expired due to old age. As I was responsible for his last rites, I was a little worried. My friend came in like an angel. He showed me on my mobile there were dozens of applications which manage all aspects of the "Last rites" including hearth, purohit, helping in appointments and documentation like death certificate and even calling his friends for the funeral. I was really



surprised and was in a way happy to get the much-needed help. These mobile apps have completely covered literally all aspects of human life.

Every person on this planet earth is now aware of the mobile applications and what it can do for him or her. The entire development of this space has happened in last 25 years or so. We all now know and use mobile apps for our work of any type. I was astounded to find that mobile apps help an individual right from his birth to his death. We have in a very short time become very accustomed to use of mobile apps and the initial phobia of using payment gateways etc. has melted away.

If we look at the scale of mobile apps usage anyone would be very surprised. At present the number of mobile devices is almost twice the population of the world. The total number of mobile apps is above 90 lakhs. There are two main groups where these apps are hosted. Nearly half of these apps are on Google play store and 30 % are on Apple app store. Instagram is the most downloaded app at present. App ratings are normally given in terms of 0 to 5, 5 being the highest. It is normally considered safe to use app with good rating and maximum no of downloads. Whatever may be the ratings when the app is free, ad revenue is the reason and your personal data may be used and shared for a cost by the app. It is very important to review the permissions we are giving while registering in to an app which is seldom done.

Mobile application categories are mainly Native and web. Additional categories are a combination of the two. Native application relies on processing in the handset of the mobile phone itself and thus the mobile phone type and capacity will have a large influence on the app performance. The other category is web application. It relies on the processing on the web server and does not depend much on mobile phone, thus it will have same performance irrespective of the phone but will depend on net speed and number of concurrent users. Typically, as the mobile phones have become more sophisticated and powerful more and more Native apps are being developed and used.

Mobile applications are in multiple spaces or types based on the usage area. The main areas are Lifestyle, social media, Games, Utility, Entertainment, Travel, Food, Finance, news, productivity, Photos and videos, Education and biggest of all Shopping. As you can see the mobile apps touch all aspects of our life and try and make it easier, effective, and useful. At present the most famous and used mobile apps all over the world are Instagram, TikTok, Facebook, WhatsApp, Cap cut, Telegram, Snapchat, Temu, Spotify in order of their download history. Google and Apple app stores are most powerful stores to download the apps. As app development has become easier due to standard components for the code being available freely, newer applications making is no longer difficult. As we are reading this article, during this time, at least hundreds of new applications would have got already published on the net.



मिलिंद जोशी
९८१९७ ९७२५८

# नीज माझ्या नंदलाला...

धाकटं पिल्लू नव्या नोकरीच्या निमित्ताने पहिल्यांदा घराबाहेर पडलं. नवीन शहर, नवीन घर. गेल्या गेल्या लक्षात आलं, चार मजली इमारतीत चौथ्या मजल्यावरच्या टेरेस फ्लॅटमध्ये राहणारा तो इमारतीतील एकमेव रहिवासी आहे. हे लक्षात आल्यावर त्याने घरी फोन केला. आई इथे मी एकटाच आहे. झोप येत नाही. आपलं गाणं रेकॉर्ड करून पाठव ना. त्याचा स्वर ऐकून मी गलबलले. अनोळखी ठिकाणी माझं पिल्लू अगदी एकटं होतं आणि मी दुसरं काही करू शकत नव्हते. गाणं रेकॉर्ड केलं आणि पाठवलं. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याचा फोन आला. आई झोप लागेपर्यंत गाणं ऐकत राहिलो. कधी झोप लागली कळलंच नाही. ती किमया गाण्याचे शब्द, सूर आणि स्वर यांची होती. अंगावर मायेचं पांघरूण पसरणारं हे गाणं होतं, लताबाईंनी गायलेली आणि श्रीनिवास खळे यांनी स्वरबद्ध केलेली अंगाई.. 'नीज माझ्या नंदलाला'.. आनंदयात्री कवी मंगेश पाडगावकर यांची कविता.

गीताची सुरुवातच अतिशय हळुवार आहे.. 'नीज माझ्या नंदलाला..' विलक्षण वेगळा हळवा स्वर लावला आहे लताबाईंनी. शांत हे आभाळ सारे.. वातावरणातला शांतपणा शब्दात, सुरात आणि आपल्या मनात झिरपत जातो. अवखळपणा सोडून झऱ्याचा सूरही मंद झाला आहे. बाहेरचा हा शांतपणा किती कमालीचा असावा. गोठ्यातल्या गाई देखील हंबरणं विसरून निद्राधीन झाल्या आहेत. पाखरं निश्चल झाली आहेत. बाहेर पसरलेलं चांदणं इतकं टिपूर..इतकं शुभ्र आहे की जणू त्याला नजर लागू नये म्हणून सावल्यांची तीट रेखली आहे. सुरेख कवी कल्पना. आत्ता या वेळी फक्त एकच गोष्ट सजग आहे ती म्हणजे रातराणीचा वाऱ्यावर पसरलेला गंध. अशा या शांततेत माझ्या बाळा तू एकटाच जागा आहेस. शेवटची



ओळ तर विलक्षण सुंदर.. आवरी या घागऱ्यांच्या छंदताला रे.. आईला बाळाच्या पायातील घागऱ्यांत मोहक असा नाद ऐकू येतोय. बागुलबुवाची भीती न घालता रचलेली अंगाई. वारा, घर, पक्षी, गाई सगळी वर्णन तीच जी सगळ्या अंगाईत असतात. पण गीतकार जर शब्दांचा किमयागार असेल तर तेच शब्द विलक्षण झळाळी घेऊन येतात.

अवघ्या आठ ओळींची ही कविता, पण श्रीनिवास खळे या ऋषीतुल्य कलाकाराचा परीसस्पर्श झाला आणि एक अजरामर अंगाई जन्माला आली. 'सांगा कसं जगायचं', 'धारानृत्य..' अशा कवितांपासून ते प्रेमावरील.. 'तुमचं आमचं सेम असतं'.. 'सांग सांग भोलानाथ' अशी बालगीतं ते 'नीज माझ्या..' सारखी अंगाई.. अशा वेगवेगळ्या विषयांवर कविता लिहिणारे पाडगावकर. पाडगावकर आणि श्रीनिवास खळे जिवश्च कंठश्च मित्र. आकाशवाणीवरील नोकरीच्या पहिल्या दिवसापासून मैत्री सुरू झाली ती शेवटपर्यंत. खळे यांच्या रचना, तुकारामांचे अभंग असोत की राम शाम गुणगान, ऐकायला गोड पण सामान्य व्यक्तीसाठी गुणगुणणं ही अवघड. अपवाद बालगीतांचा. ती मात्र तेवढीच गोड. सुरुवातीस अण्णांनी काही चित्रपट केले पण बंधनात राहून चाली बांधणं त्यांना पटलं नाही. फक्त स्वत:च्या आनंदासाठी गाण्यांची निर्मिती केली आणि त्यातच रमले. त्यांनी जवळपास दीडशे कवींच्या कवितांची गाणी केली. त्यांच्यावर मजेत एक आरोप केला जातो की त्यांनी आपल्या मित्राच्या, पाडगावकरांच्या कवितांना झुकतं माप दिलं. त्यांनी केलेली जास्तीत जास्त गाणी ही पाडगावकरांच्या कवितांवरील आहेत. यावर अण्णांचं मिश्किल उत्तर असं की, 'तो कविताच इतक्या गोड लिहितो की त्याला मी तरी काय करू'.. अण्णांच्या चाली गायला खूप अवघड.. या आरोपाला उत्तर देताना खळे अण्णा म्हणतात, चाल ही कवितेत असतेच. मी कविता वाचतो तेव्हा मला जाणवते आणि मी तिला फक्त प्रत्यक्षात आणतो. पाडगावकर म्हणतात 'माझं गाणं खळेंनी चाल केल्यावरच मला जास्त कळतं.' हे कितीही खरं असलं तरी नीज माझ्या नंदलाला सारखी चाल बांधणं कसबच आहे. प्रत्येक अंतरा वेगळा चालीचा.. वेगळ्या सुरावरनं सुरू होणारा. राग कोणताही एक असा नाही. साऱ्या सुरांचा मनसोक्त वापर आणि लताबाईंचा तिन्ही सप्तकातून सहज फिरणारा आवाज.. अंतऱ्याच्या शेवटी अचूक.. नंदलाला रे.. षड्जावर येणारा.

सगळी अंगाई गीतं, पाळणे हे फक्त मुलांसाठी रचले गेले आहेत. मुलींसाठी एकही अंगाई किंवा पाळणा नाही.. वगैरे कितीही आरोप केले गेले असले, तरी मराठीतील 'नीज माझ्या नंदलाला' आणि हिंदीतील 'धीरे से आजारी अखियन में' या अंगाईंना तोड नाही. विशेष म्हणजे दोन्हींचे रचनाकार आपले मराठी.. अण्णा खळे आणि अण्णा चितळकर.. आहेत आणि दोन्ही आपल्या गानसरस्वती लताबाईंनी गायल्या आहेत.




अनुश्री क्षीरसागर
९८२०५०९७६२

# शिव – शक्ति : आकाशगंगेचे धागेदोरे!

नमस्कार मित्रहो !

Milky Way म्हणजेच आपली आकाशगंगा. अब्जावधी तार्यांचा समूह एका ठराविक 'पद्धतीने' तिच्या केंद्राशी फिरत राहतो. जणूकाही सूर्याभोवती फिरणारे ग्रह. आपल्या आकाशगंगेची निर्मिती ही सुमारे १२ अब्ज वर्षांपूर्वी दोन दीर्घिकांच्या मिलनातून झाली. निर्मितीनंतर हळूहळू तार्यांची निर्मिती होऊ लागली. हायड्रोजन व वायूंचे ढग एकमेकांना आपटून घासून ऊर्जा निर्मिती होऊन तार्यांची निर्मिती होऊ लागली. काळानुसार त्याचा आकार व आवाका बदलत राहिला. आज आपली आकाशगंगा एका ठराविक आकारात म्हणजेच सर्पिल (Spiral) बनली. जणूकाही गरमागरम जिलेबी !




सध्या आपल्या आकाशगंगेचा आकार काही शे किलोमीटर मध्ये न मोजता प्रकाशवर्ष ह्या परिमाणा मध्ये मोजतात. आपल्या संपूर्ण ब्रह्मांडात सर्वात वेगवान वस्तू म्हणजे प्रकाश. ३ लाख किलोमीटर प्रति सेकंद इतका भयानक स्पीड आहे प्रकाशाचा ! म्हणून प्रकाशाने एका वर्षात ३ लाख किलोमीटर प्रति सेकंद वेगाने कापलेल्या अंतरास १ प्रकाशवर्ष म्हणतात. किलोमीटर मध्ये बोलायचे तर जवळपास साडेनऊ लाख कोटी किलोमीटर !!!

अश्या ह्या अफाट व विलक्षण आकाशगंगेचे निरीक्षण करणारी हबल, चंद्रा व हल्लीची वेब टेलिस्कोप बद्दल आपण ऐकलं वाचलं असेल. त्यांच्या सोबतच युरोपीय अंतराळ संस्थेची Gaia नावाची एक टेलिस्कोप सुद्धा गेली १० वर्षे निरीक्षण व सखोल अभ्यास करत आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या नवीन शोधामध्ये आपल्या आकाशगंगेच्या मुळ घटकांवर (Building Blocks) वर एक शोधनिबंध सादर केला त्याच्या नुसार आकाशगंगेची जडणघडण होताना २ प्रकारच्या तारांकित माळांचा शोध लावला गेला. प्रत्येक तार्याचे २ महत्त्वाचे घटक असतात. त्यातील एक घटक



तार्यांच्या फिरण्यावर किंव्हा त्याच्या गतीवर आहे तर दुसरा त्यातील ऊर्जेवर ! जेव्हा २ दीर्घिका एकमेकांना टक्कर देऊन मिसळून जातात तेव्हा तेथील तारे हे त्यांच्या मूळ दीर्घिकेतील मूलभूत घटकांवरुन ओळखू शकतो. म्हणजेच त्यांची गती, दिशा एकसमान असू शकते. ह्या संमिलनातून केंद्रापासून दूरवर वेगवेगळ्या अंतरावर तारे निर्माण होत गेले. त्यांच्या तुलनेत केंद्रस्थान मात्र जुने होत गेले.

सोपे करून सांगायचे तर एक आकाशगंगेच्या सुरुवातीचे तारे आता म्हातारे झाले आहेत. त्यामुळे त्यातील पोषणमूल्ये (मूलद्रव्ये / Elements) कमीच असतील. जसे आपल्या बाबतीत घडते. पण ह्या नवीन शोधलेल्या २ नवीन बाहु मधील तार्यांची गती ही केंद्रापेक्षा जास्त आहे. तसेच त्यांचे वयही सुमारे १२ अब्ज वर्षे आहे ! आकाशगंगेतील अश्या २ नवीन माळेतील तार्यांची गती ज्यास Angular Momentum म्हणतात, ती जास्त आहे. Angular Momentum म्हणण्याचे कारण ते गोलाकार मार्गाने केंद्राभोवती भ्रमंती करतात. कोनिय संवेग हा मराठी शब्द.

ह्या तार्यांच्या २ माळा आपल्या आकाशगंगेच्या गळ्यात अगदी आकाशगंगेच्या सुरुवातीपासूनच ओवल्या गेल्या आहेत. मागे उल्लेख केल्याप्रमाणे, ह्या सुरुवातीच्या तार्यांमध्ये कमी पोषणमूल्ये / मूलद्रव्ये असतात. म्हणुनच आकाशगंगेच्या केंद्राला Poor Heart किंव्हा हलक्या मनाचा म्हणतात. पण ह्या नवीन २ माळेतील तार्यांमध्ये अशी कमी मूलद्रव्ये आढळून आली नाहीत. सहाजिकच त्यांची ऊर्जा सुद्धा जास्त आढळून आली. म्हणुनच त्यांच्या गती व ऊर्जेच्या वेगळेपणामुळे ती इतर प्राचीन तार्यांपासून हटके ठरतात. आपल्या आकाशगंगेच्या 'वस्त्रा' वरील हे २ 'धागेदोरे' आकाशगंगेच्या उत्पत्तीचे मुळ घटक असल्याचे व्यक्त केले आहे आणि तार्यांच्या ह्या दोन माळांना 'शिव' व 'शक्ति' ही नावे बहाल केली आहेत. जर्मनीच्या मॅक्स प्लांक विद्यापीठाच्या भारतीय वंशाच्या ख्याती मल्हन व त्यांचे सहकारी हँस वॉल्टर- रिक्श ह्यानी हा शोध निबंध जगासमोर मांडला.

शिव म्हणजे वस्तू, आकार आणि शक्ति म्हणजे गती, ऊर्जा ! शिव आणि शक्तीच्या मिलनातून ह्या ब्रह्मांडातीची निर्मिती झाली अशी आख्यायिका आहे. म्हणुनच तेथील तार्यांची Angular Momentum व Energy ही अनुक्रमे शिव व शक्ति दर्शवितात.

तसेच आध्यात्मिक बाबतित बोलायचे झाले तर शिव व शक्ति जेव्हा विवाहबंधनात बांधले गेले तो दिवस म्हणजे महाशिवरात्र. मागील महिन्यातच माघ कृ. त्रयोदशी ला म्हणजेच ८ मार्चला आपण महाशिवरात्र साजरी केली व त्यानंतर ३ आठवड्यातच हा शोध निबंध प्रकाशित झाला !! हा योगायोग तर नाही ना ??

चंद्रयान ३ ने चंद्रावर लॅण्ड केलेल्या जागेला मा. पंतप्रधान मोदींनी बहाल केलेल्या 'शिव शक्ति' ह्या नावावर International Astronomical Union ने हल्लीच शिक्कामोर्तब केले, ते सुद्धा ह्या शोधनिबंधाच्या प्रकाशनाच्या २ दिवसानंतर !! हा सुद्धा एक प्रकाराचा योगायोग तर नाही ना ??



अंबरीश पवार
९६१९१९४६४०

# रंग तरंग

गेल्या भागात आपण पोस्टर कलर आणि जलरंग यांची माहिती करून घेतली. आज आपण इतर माध्यमांची ओळख करून घेणार आहोत.

**तैल रंग (ऑइल कलर्स) :**

तैलरंग हे खूप पुरातन काळापासून चालत आलेलं अपारदर्शक रंग माध्यम आहे. हे रंग नैसर्गिक आणि कृत्रिम रंगात ऑइल मिक्स करून बनविले जातात. यात काम करण्याची मजा काही वेगळीच असते. या रंगाला रिचनेस पण खूप असतो. हे रंग लवकर सुकत नसल्यामुळे खूप काळ ओले राहतात त्यामुळे तुम्हाला छान ब्लेंडिंग करत काम करता येते पण जर तुम्हाला जाड थरांमध्ये काम करायचं असेल तर मात्र हाच त्याचा गुणधर्म थोडा जाचक ठरतो कारण हे रंग पूर्णपणे वाळायला खूप वेळ लागतो त्यामुळे पहिला थर पूर्णपणे वाळल्याशिवाय दुसरा थर देणे कठीण जाऊ शकते. तसेच हे रंग जर पूर्णपणे वाळले नाहीत तर दमट हवेत या चित्रांना बुरशी किंवा फंगस लागू शकतं. खरंतर आता बाजारात खूप नवनवीन माध्यमं आली आहेत जी या तैल रंगात मध्ये वापरून हे कलर्स लवकर वाळायला मदत करतात. तैल रंगात चित्र करायला आणि बघायलाही खूपच छान वाटते.

**ऍक्रेलिक रंग :**

हेही अपारदर्शक रंग माध्यम आहे आणि पाण्यात मिक्स करून वापरायचे रंग आहेत . तैल रंगाला पर्याय म्हणूनही आपण हे रंग वापरू शकतो पण तैल रंगाचा रीचनेस यात नाही हे थोडे कृत्रिम वाटतात.



मुख्य म्हणजे हे रंग खूप लवकर सुकतात त्यामुळे तुम्हाला आधी प्लॅन करून वेळ न दवडता लवकर लवकर चित्र पूर्ण करावे लागते. या रंग माध्यमात आपण जलरंगासारखे पारदर्शक रंग वापरूनही काम करू शकतो तसेच इम्प्रस्टो सारखे जाड्या थरामध्येही काम करता येते आणि लवकर वाळत असल्यामुळे एकावर दुसरा थर दिला तरी तो मिक्स होत नाही. हे रंग थोडे प्लास्टिक आणि कृत्रिम वाटत असले तरी सुरुवातीला रंग हाताळायला शिकताना हे खूप सोयीचे माध्यम आहे. अपारदर्शक गुणधर्मामुळे काही चूक झाली तरी त्यावर दुसरा थर देऊन ते झाकता येते तसेच हे कलर्स कोणत्याही पृष्ठभागावर वापरता येतात. कुठलीही चित्र या माध्यमाद्वारे करता येतात.



**चारकोल :**

ब्लॅक अँड व्हाईट चित्रांसाठी हे खूपच सुंदर माध्यम आहे. यात विलो किंवा वाईन चारकोल आणि compressed (कॉम्प्रेस) चारकोल असे दोन प्रकार येतात. विलो चारकोल हे नैसर्गिक विलो झाडाच्या फांद्या जाळून बनविले जातात. हे सर्वात डार्क आणि भरपूर छटा देणारे चारकोल आहेत. तसंच द्राक्षाच्या वेलींच्या फांद्या जाळून ग्रे किंवा ब्लॅक वाईन चारकोल बनविले जातात जे थोडे हार्ड असतात. पण हे कॉम्प्रेस चारकोल पेक्षा सॉफ्ट असतात आणि त्यामुळेच जास्त ठिसूळ असतात. हे नैसर्गिक रित्या बनत असल्यामुळे त्यामध्ये कोणतेही बाईंडर वापरले जात नाही आणि त्यामुळे ते जास्त सॉफ्ट असतात तसंच खोडल्यावरही त्याचे मार्क्स राहत नाहीत. त्यामुळे स्केचिंग साठी, सावल्यांचा खेळ दाखवण्यासाठी तसंच कॅनव्हास वर चित्र करताना अगोदर स्केच काढण्यासाठी हे चारकोल वापरणे सोयीचे जाते.

**कॉम्प्रेस (compressed)चारकोल :**

चारकोलच्या पावडर मध्ये गम किंवा वॅक्स हे बाईंडर म्हणून वापरून कॉम्प्रेस चारकोल बनवले जाते आणि नंतर मोल्डमध्ये घालून त्यांच्या स्टिक्स बनवल्या जातात या आपण क्रेऑनसारख्याही वापरू शकतो. यात किती प्रमाणात चारकोल पावडर आणि बाईंडर यांचं मिश्रण आहे त्यानुसार त्यांचा मऊपणा आणि कठीणपणा ठरतो. जास्त बाईंडर असेल तर ते जास्त कठीण (हार्ड) असतात आणि कमी प्रमाणात गडत (डार्क) असतात कारण त्यात चारकोल पावडर चे प्रमाण कमी असते. त्यामुळे जास्त कठीण तेवढा त्याचा गडतपणा कमी म्हणजे कमी टोनल व्हॅल्यूज. जास्त बाईंडर मुळे हे पृष्ठभागावर चिकटून बसतात त्यामुळे खोडल्यावरही पूर्णपणे निघत नाहीत. तसेच नुसती चारकोल पावडरही आपण ब्लेंडिंग साठी स्मजिंग साठी वापरू शकतो.

**सॉफ्ट पेस्टल :**

हे एक खूप सुंदर व्हायब्रंट रंग माध्यम आहे. पावडर कलर मध्ये पाणी आणि कृत्रिम रित्या बनवलेले बाईंडर्स मिक्स करून हे रंग बनवले

पान १० वर

# MONEYSMART

वयोगट ६० ते ९० व पुढे आपण आता स्वत:ला 'वरिष्ठ नागरिक' म्हणवून घ्यायला सुरुवात करीत आहोत. उर्वरित आयुष्य चिंतामुक्त, आरोग्यपूर्ण सुखासमाधानाने कसे जाईल याची सर्वतोपरीने काळजी घेणे हे उत्तम. बहुतांशी मंडळींचे नवीन अर्थार्जन कदाचित थांबलेले असते (फारच थोड्या लोकांना पेन्शन मिळते) व जी काय आजपर्यंत साठवलेली पुंजी असेल तीच संभाळून व जमल्यास योग्य रितीने त्यात वाढ होईल व दर महिन्याला जीवनावश्यक असा पुरेसा पैसा उपलब्ध होईल याची अक्कल हुशारीने तजवीज करणे अत्यंत गरजेचे आहे. बऱ्याच जणांची अवस्था 'Property rich but cash poor' अशी असते ते टाळता आले तर बरे. या वयात आपल्या पुढील पिढीवर पैशासाठी अवलंबून राहण्याची वेळ न येणे चांगले. जीवनाचा शेवट कधी होईल हे आपल्या हातात नसते मात्र जिवंत असेपर्यंत आपली निदान आर्थिक दृष्ट्या तरी दयनीय अवस्था येऊ नये याची काळजी घेणे आवश्यक असेल.

खास या वयोगटासाठी काही ठळक निरीक्षणे थोडक्यात खालील प्रमाणे:-

१) स्वत: व पत्नीचा मेडिक्लेम विमा प्रत्येकी किमान रु. १० लक्ष इतक्या रकमेचा जरूर असावा व हे जरूर असल्यास टॉप अप आपल्या ६० वर्षे वयाच्या अगोदरच करावे.

२) आपले राहात असलेले स्वत:च्या मालकीचे घर सोडून इतर काही स्थावर मालमत्ता आपल्या नावावर असेल व त्यात आपल्या मुलांना राहण्यात रस नसेल तर वेळेवर त्याची विक्री करून पैसा इतरत्र गुंतविण्यासाठी मोकळा करावा अगोदरच्या लेखांमधील या विषयावरील टिपणी पहावी.

३) वृद्धपणी आपले (आर्थिक दृष्ट्या नव्हे) हवे - नको पहणारे व काळजी घेणारे कोणी जवळपास नसेल तर 'अथश्री' सारखा पर्याय (जिथे 'आस्था' सारखी सोय असेल) निवडण्याचा विचार जरूर करावा मात्र तिथे घर विकत न घेता भाड्याने मिळवून रहावे म्हणजे पैसा अडकून पडत नाही.



४) दर महिन्याला पुरेसा पैसा येत नसेल तर स्वमालकीच्या राहत्या घरासंदर्भात 'रिव्हर्स मॉर्गेज' पर्यायाची चाचपणी करावी.

५) शेअरबाजारात अजिबात जोखीम घ्यायची इच्छा नसेल तर ही वृत्तीच तुम्ही एक फार मोठी जोखीम घेत असल्याचे दर्शविते. चलन फुगवट्याचा दर प्रत्यक्षात खऱ्या अर्थाने सुमारे १०% आहे असे गृहीत धरावे तेंव्हा, आपल्या गुंतवणुकीवर या पेक्षा दीर्घकालीन कमी परतावा मिळणार असेल तर पुढील काळात आर्थिक दृष्ट्या गंभीर परिस्थिती ओढवणार हे निश्चित अशा वेळेला फक्त बँकांच्या मुदत ठेवींवरील तुटपुंज्या व्याजावर अवलंबून न रहता पुरेशी रक्कम म्युचवल फंडांच्या 'Balanced Advantage Scheme' मध्ये गुंतवून SWP चा विचार जरूर करावा.

६) या वयात हळूहळू प्रत्यक्ष वेगवेगळ्या कंपन्याच्या शेअर्समधील गुंतवणुकीचे व्यवस्थापन अवघड जाऊ शकते उदा. Split, bonus, merger/ de-merger, buyback, dividend, listing/ de-listing इत्यादीचे भान ठेवत सातत्याने monitoring करीत रहणे कटकटीचे भासू शकते. अश्या वेळी Mutual Funds चा योग्य पर्याय व त्याचे वर्षातून निदान एकदा monitoring करणे सुलभ पडते.

७) आता ज्या योजनेत जीवनवीमा निगडित आहे अशा कोणत्याही नवीन गुंतवणूक योजनेचा अजिबात विचार करू नये आपल्या जाण्याने आप्तस्वकीयास दु:ख होईल पण त्यांचे आता ते उघडेपडून आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाही.

८) महाग औषधांबद्दली योग्य त्या वैद्यकीय सल्ल्याने जेनेरिक औषधांच्या पर्यायांचा शोध घ्या त्याने पैसे वाचतात.

९) अपात्री दानधर्म टाळता आला तर उत्तम.

१०) वेळप्रसंगी आपले ताट द्यावे पण पाट देऊ नये ह्या -उक्तीचा व्यावहारिक अर्थ समजून तसे वागावे.

११) मुलांच्या संसारातील आर्थिक निर्णयामध्ये उगीच ढवळाढवळ करू नये. सल्ला विचारला तरच द्यावा मात्र तो त्यांनी तसाच अमलात आणावा असा अट्टहास धरू नये.

१२) आपल्या सर्व स्थावर व जंगम संपत्तीचे रितसर मृत्युपत्र (Will & Testament) निस:धग्धपणे योग्य रीतीने बनवून ठेवावे मात्र नंतर त्याच्या executors ला / ना प्रोबेट घ्यावयास लागेल किंवा कसे याची माहिती/ पडताळणी एखाद्या चांगल्या वकिलाकडून अगोदरच करून घ्यावी कारण प्रोबेट घेणे अत्यंत वेळखाऊ, खर्चिक व कटकटीची प्रक्रिया असते.



**प्रकाश जोशी**
मो. ९९२०३३४७६२

## डॉ. गिरीश जाखोटिया यांच्या कडून वाचकांना 'उद्योजकीय सल्ल्यांची' भेट

दि. २३ मार्च रोजी प्रसिद्ध साहित्यिक, लेखक डॉ. गिरीश जाखोटिया यांच्या 'उद्योजक कसे बनतात?' हे पुस्तक सनय प्रकाशनतर्फे प्रकाशित झाले आहे. डॉ. गिरीश जाखोटिया यांनी त्यांचा चाळीस वर्षांचा उद्योजकीय क्षेत्रातील दीर्घ अनुभव वापरीत हे लेखन केले आहे. शेकडो उद्योजकांना डॉ. जाखोटियांच्या सल्ल्याचा लाभ आजपर्यंत मिळालेला आहे. उद्योजक कसे बनावे, उद्योग कसा वाढवावा, अडचणीतून उद्योग कसा सावरावा इ. विविध प्रकारे हा ग्रंथ मार्गदर्शन करतो.

ग्रंथ २३२ पानांचा असून त्याची किंमत रु.३०० इतकी आहे. ग्रंथासाठी ९८६०४२९१३४ या सनय प्रकाशनाच्या दूरध्वनीवर संपर्क करावा. www.sanaybooks.com या संकेतस्थळावरही संपर्क करता येईल.







पान ९ वरून

## रंग तरंग



जातात पण खूप ड्राय असल्यामुळे हे खूप ठिसूळ असतात त्यामुळे जास्त सांभाळावे लागतात.



रांगोळीचे रंग स्टिक फॉर्म मध्ये असल्यास जसे दिसतील तसे हे रंग असतात.

**गौचे(Gouche रंग) :**

याला आपण अपारदर्शक जलरंग म्हणू शकतो . वॉटर कलर सारखेच ह्याचे लार्ज पिगमेंट्स बाईंडर मध्ये मिक्स केलेले असतात. तसंच हे वॉटर बेस असल्यामुळे लवकर सुकत नाही आणि सुकले तरी पुन्हा पाणी घालून वापरता येतात. अपारदर्शक असल्यामुळे वापरायला ही सोयीचे असते. ॲक्रेलिक Gouche कलर्स मात्र प्लास्टिक बाईंडर बरोबर मिक्स केलेले असतात त्यामुळे लवकर सुकतात व पाणी मिक्स करून पुन्हा वापरता येत नाहीत.

चला तर मग, आता वेगवेगळ्या माध्यमांशी ओळख तर



झाली. मग व्हा तयार, घ्या आपल्या आवडीचं माध्यम हाताळायला आणि रंगून जा आपल्या छंदात.



प्रज्ञा राजे
९८२११२५९८८७

## विलेपार्ले डिरेक्टरी २०२४

# आकारास येतयं पार्ल्याचिं 'गुगल'

मेहनती व जिद्दी व्यावसायिकांना प्रोत्साहन देण्यासाठी पार्लेबाजार ने १ ऑक्टोंबर २०२३ रोजी साठ्ये महाविद्यालयातील सभागृहात Bizz Master's हा कार्यक्रम आयोजित केला होता. यामध्ये २० पेक्षा जास्त व्यवसायिकांचा सहभाग होता. Bizz Master's ने फेसबुक लाईव्ह, युट्युब अश्या माध्यमांद्वारे घराघरात पोहचून व्यवसाय करु पाहणाऱ्या आणि व्यवसाय करत असणाऱ्या सगळ्यांनाच व्यवसायिक प्रेरणा दिली.Bizz Master's च्या घवघवीत



यशानंतर पार्ले बाजार आता नवीन प्रॉडक्ट घेऊन येत आहे ते म्हणजे पार्ल्याची आगळी वेगळी सेक्शन वाईज 'विलेपार्ले डिरेक्टरी' २०२४. ही डिरेक्टरी एप्रिल २०२४ च्या शेवटी प्रकाशित करण्यात येणार असून ही डिरेक्टरी पार्ल्यातील बुक स्टॉल आणि विविध ऑनलाइन प्लॅटफॉर्मसह सर्व पेपर स्टॉलवर उपलब्ध असणार आहे . याबद्दल सविस्तर सांगत आहेत Parlebazaar.com च्या CEO चंदा मंत्री.

**प्रश्न :- पार्ले डिरेक्टरी बद्दल तुम्ही काय सांगाल ?**

पु. ल. देशपांडे यांनी म्हटल्याप्रमाणे मुंबईच्या गोलाकरी पोटातून उद्यास आलेलं छोटस उपनगर पार्ले ! मागच्या काही वर्षात हे आपलं पार्ले अगदी बदललं, बहरलं. छोटं छोटं म्हणताना चहूबाजूंनी पसरलं हातावर मोजता येणारे उद्योग, अगदी सर्वांना ओळखता येईल इतपत असणारे लोक हे चित्र जाऊन पार्ल्यातला एखादा रोडही एखाद्या उपनगरासारखा भासायला लागला आहे. पार्ले हे उद्योगाचे माहेरघर झाले आहे, असेच म्हणायला हवे. इतके वेगवेगळे उद्योग येथे उदयालाही आले आहेत आणि त्यांचा विकास आणि विस्तारही तेवढ्याच वेगाने होतोय. हे सगळ होताना पार्ल्याने आपली जुनी संस्कृती तर जपली आहेच पण नवीन संस्कृतींना, लोकांनाही उत्तम रीतीने सामावून घेतले आहे. आज पार्ल्यात खूप वेगवेगळे उद्योग अगदी उत्तम प्रकारे चालत आहेत.

आपण असं म्हणतो की जग बदलत आहे. पूर्ण Digitalise झालं आहे. त्यामुळे या सगळ्या उद्योगांची माहिती google वर/ internet वर सहज मिळू शकते, असं म्हणतात youtube वर सगळ्या Recipes पटकन बघता येतात पण जेवणाचं भरलेलं ताट आपल्यासमोर कोणी आणून ठेवलं तर मनाला आणि पोटाला कसा आनंद होतो, तसचं काहीसं विलेपार्ले डिरेक्टरी च्या बाबतीत ही होणार आहे.

भले सारी माहिती google वर उपलब्ध असली तरी शोधायचे कष्ट न करता सगळ्याच व्यवसायांची सेक्शनवाईज माहिती 'पार्ले डिरेक्टरी' मध्ये मिळेल म्हणजेच डिरेक्टरी उघडा आणि हवी ती माहिती घ्या अगदी क्षणार्धात !

**प्रश्न :- तुम्हाला 'विलेपार्ले डिरेक्टरी' ची कल्पना कशी सुचली ?**

ही कल्पना कशी सुचली असे विचाराल तर एकच उत्तर, कधीतरी एखादी कल्पना पटकन क्लिक होते आणि मग त्यावर थोडी मेहनत घेतली की एका छान कलाकृतीची / गोष्टीची निर्मिती होते. तसेच काही वर्षांपूर्वी विलेपार्ले डिरेक्टरीच्या बाबतीत झालं.

आपल्या पार्ल्याचीही एखादी सेक्शन वाईज डिरेक्टरी (Section wise) करावी म्हणजे बऱ्याच गोष्टी सहज सोप्या होतील असं वाटलं आणि कामाला सुरुवात केली. पार्ल्यातल्या व्यवसायिकांना ही कल्पना आवडली आणि त्यांनीही जाहिराती देऊन चांगला पाठींबा दिला.

आता घरात लग्न असो, मुंज असो, कॅटरेस्ट, डेकोरेटर्स हवे आहेत किंवा फायनान्स सेक्शन मध्ये बँकांचा नंबर हवाय किंवा पैसे गुंतवायचे आहेत, इन्व्हेस्टमेंट कन्सल्टंट शोधताय वा भूक लागली आहे आणि हॉटेलचा नंबर शोधताय किंवा पार्ल्यात हेल्थ सेक्टरमध्ये डॉक्टर, हॉस्पिटल शोधताय सारं काही यात मिळेल त्यांच्या नाव पत्त्यासकट! याव्यतिरिक्त कन्स्ट्रक्शन, फॅशन, एज्युकेशन अशी अनेक सेक्शनस् ची माहिती यामध्ये आहे. या डिरेक्टरी




मध्ये आम्ही पार्ले हे केवळ पूर्व विभागापुरते मर्यादित न ठेवता पश्चिम विभाग देखील कव्हर केला आहे. पार्ले इथे १० बीएमसी वॉर्ड आहेत तर आम्ही आसपासचा विभाग कव्हर करण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रश्न :- आता आपण बघतोच आहोत की संपूर्ण जग डिजिटल झालयं मग या डिजिटलायझेशनशी एकरूप झालेल्या जगापर्यंत 'पार्ले डिरेक्टरी' तुम्ही कशी पोहचवाल ?**

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा स्वदेशी वापरा, स्वदेशी वापरा आपला पैसा बाहेरच्या देशात जाऊ देऊ नका असा मंत्र सारे जण देत होते.आजही असे वाटते की पुन्हा कुठेतरी ह्या विचारांचा पुरस्कार करायला हवा. संदर्भ थोडा वेगळा आहे म्हणजे पूर्वी लोक व्यवसायाची जाहिरात, वर्तमानपत्र, मासिके होर्डिंग्ज इ. मधून करत. त्यामुळे वाटीतून ताटात अन् ताटातून वाटीत असं म्हणतात त्याप्रमाणे पैसे आपल्याच देशात राहत होते पण गेल्या काही वर्षांपासून सोशल मीडियाचे वर्चस्व एवढे वाढले की फॅशन झाल्याप्रमाणे प्रत्येक जण फेसबुक, इंस्टाग्राम वर जाहिरात करायचा अट्टाहास करतो आहे आणि त्यासाठी महिन्याचे हजारो रुपये खर्च करतो आहे पण खरंच त्यातून जेवढा खर्च होतोय तेवढा फायदा मिळतो आहे का ? याचा विचार कोणीच करत नाही आणि आपला पैसा मार्क झकरबर्ग च्या खिशात जातोय हे वेगळच !

ह्याचा विचार करताना एक कल्पना सुचली की वाऱ्याप्रमाणे आपणही थोडी दिशा बदलायला हवी. त्यामुळेच पार्ल्याचे २ पेपर्स आणि एक बिझनेस प्लॅटफॉर्म www.parlebazaar.com असला तरी हल्ली सगळ्यात सोपा मार्ग म्हणजे 'App'.

अगदी मोबाईलच्या छोट्याशा जागेत मावणारे आणि जग कवेत घेण्याची हिंमत असणारे काही असेल तर 'App'.

खूप वेगवेगळे फीचर्स ॲड करून आणि अजूनही उत्तम गोष्टी वापरून आपले ॲप छान तयार होत आहे. यातही वेगवेगळे सेक्शन्स आहेत सबसेक्शन्स आहेत. क्लिक केल्यावर त्यातील व्यवसायांची, प्रोफेशनल्स ची माहिती क्षणार्धात मिळेल. नवीन गोष्टींचे, आगामी कार्यक्रमांचे, सहली, फंक्शन इ. चे अपडेट मिळतील, माहिती चटकन शेअर करता येईल, बुकमार्क करता येईल, नंबर दिसला की डायरेक्ट कॉल बटन दाबले की कॉल करता येईल. लिंक वर क्लिक करून अधिक माहिती क्षणार्धात मिळवता येईल या आणि अशा बऱ्याच गोष्टी ॲप मध्ये ग्राहकांसाठी असणार आहेत. जर काही गोष्टी डिरेक्टरीच्या प्रिंट किंवा डिजिटल वर्जन मध्ये राहिल्या असतील तर त्या आम्ही ॲप मध्ये ॲड करण्याचा नक्की प्रयत्न करणारा आहोत. तुम्हालाही काही गोष्टी डिरेक्टरी मध्ये ॲड करायच्या असतील तर आम्हाला नक्की कळवा.

**प्रश्न :- व्यवसायिकांना ह्याचा काय फायदा होईल ?**

दुकानदारांसाठी तर स्पेशल फीचर नुसते लिस्टिंग न देता जाहिरातीला किंवा त्यांच्या डिटेल पेजला लिंक, नोटिफिकेशन, व्हिडिओ, जाहिराती आणि बरेच काही तेही रिसनेबल किंमतीत !

या इतक्या चांगल्या गोष्टी लवकरच तुमच्यासाठी आम्ही घेऊन येत आहोत मग वाट कसली बघताय प्रिंट डिरेक्टरी आजच प्री-बुक करा आणि ॲप लॉन्च झाले की लगेच डाऊनलोड करून पार्ले तुमच्या मुठीत ठेवा !



# जुनं फर्निचर

हल्ली विविध विषयांवर मराठी चित्रपट येत आहेत. याच महिन्यात शेवटच्या आठवड्यात 'जुनं फर्निचर ' हा चित्रपट प्रदर्शित होत आहे . या चित्रपटाचे पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर प्रदर्शित केले गेले. या पोस्टरमध्ये न्यायालय, न्यायधीश आणि काही कागदपत्रे दिसत आहेत, ज्यावर न्याय, हक्क, कायदा लिहिलेले आहे. त्यामुळे आता ही कोणती लढाई लढली जाणार आहे, याचे उत्तर प्रेक्षकांना चित्रपट पाहूनच मिळणार आहे.

सत्य - सई फिल्म्स आणि स्कायलिंक एंटरटेनमेंट प्रस्तुत 'जुनं फर्निचर' हा चित्रपट येत्या २६ एप्रिल रोजी चित्रपटगृहांत प्रदर्शित




होणार आहे. या म्हाताऱ्याला अडवूनच दाखवा ! ही या चित्रपटाची टॅग लाईन आहे . त्यावरून हा चित्रपट ज्येष्ठ नागरिकांवर भाष्य करणारा आहे, याची कल्पना येते. मुळात हा आपल्या आजुबाजुला घडणारा विषय आहे. हल्लीच्या तरुणाईला घरातील, घराबाहेरील वयस्कर व्यक्ती म्हणजे 'ओल्ड फर्निचर' वाटतात. परंतु याच जुन्या फर्निचरचे महत्व या चित्रपटात दाखवण्यात आले आहे. यतिन जाधव निर्मित, महेश वामन मांजरेकर दिग्दर्शित या चित्रपटाची कथा, पटकथा आणि संवादही महेश मांजरेकर यांचेच आहेत. चित्रपटाबद्दल दिग्दर्शक महेश मांजरेकर म्हणतात, ''हल्ली अनेक नवनवीन शब्द ट्रेंडिंगमध्ये आहेत. त्यापैकीच हा 'ओल्ड फर्निचर' म्हणजेच 'जुनं फर्निचर'. ज्येष्ठ नागरिकांना हल्ली 'जुनं फर्निचर' म्हणतात. परंतु हेच जुने फर्निचर आजच्या तकलादू फर्निचरपेक्षा किती मजबूत असते, हे दाखवण्याचा प्रयत्न आम्ही या चित्रपटातून केला आहे. यात भावना दडलेल्या आहेत. चित्रपटगृहातून बाहेर पडताना 'जुनं फर्निचर' बद्दलचा दृष्टिकोन बदलावणारा हा चित्रपट आहे. या चित्रपटात महेश मांजरेकर, मेधा मांजरेकर, उपेंद्र लिमये, सचिन खेडेकर, भूषण प्रधान, अनुषा दांडेकर यांच्यासह समीर धर्माधिकारी डॉ. गिरीश ओक, विजय निकम, संतोष मिजगर, अलका परब, शरद पोंक्षे यांच्याही महत्वपूर्ण भूमिका आहेत. तसेच शिवाजी साटम आणि ओंकार भोजने हे देखील यात असणार आहेत.

**मनोरंजन विश्व**

# मायलेक

आई मुलीच्या सुंदर नात्याची गोष्ट मांडणारा चित्रपट 'मायलेक' याच महिन्यात प्रदर्शित होत आहे. आई मुलीचे नाते हे सर्वात जवळचे, खास असते. कधी त्या घनिष्ट मैत्रिणी असतात, तर कधीकधी त्यांच्यात रुसवे फुगवेही असतात. आणि आसू, दुरावा अशा एखाद्या नात्यातील सगळ्या भावना आहेत. मुळात आई आणि मुलीचे नाते खूप नाजूक असते. या चित्रपटाची खासियत म्हणजे यात खऱ्या मायलेकी असल्याने त्यांच्यातील नैसर्गिक केमिस्ट्री




त्यातही मजा असते. या चित्रपटाचे वैशिष्ट्य हे आहे की सोनाली खरे आणि त्यांची मुलगी सनाया या दोघी या चित्रपटात आई मुलीच्या भूमिकेत आहेत.


सोनाली खरे या चित्रपटाची निर्माती आहे. तर कल्पिता खरे, बिजय आनंद या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. नितीन प्रकाश वैद्य या चित्रपटाचे असोसिएट प्रोड्यूसर आहेत. या चित्रपटात उमेश कामत देखील आहे .

दिग्दर्शिका प्रियांका तन्वर म्हणतात, '' आई आणि मुलीचे नाते अधोरेखित करणारा हा चित्रपट आहे. यात धमाल, मजामस्ती, हसू पडद्यावर दाखवणे मला अधिकच सोप्पे झाले. सोनाली एक उत्तम अभिनेत्री आहेच. तिचा हा गुण सनायामध्येही आला आहे. तिचा हा पहिला चित्रपट आहे, असे कुठेही जाणवत नाही.



गणेश आचवल
९८२१२६८३९१



**श्री. श्रीधर शंकर भागवत, यांना १ मार्च २०२४ रोजी, विलेपार्ले पूर्व येथील राहत्या घरी, वृध्दापकाळाने ८९ व्या वर्षी देवाज्ञा झाली. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास मोक्ष प्रदान करो ही प्रार्थना. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे, नातसून व पणती असा परिवार आहे.**

राजीव श्रीधर भागवत , सौ. राधा राजीव भागवत
संजीव श्रीधर भागवत , सौ. रसिका संजीव भागवत
ओमकार राजीव भागवत , सौ. प्रज्ञा ओमकार भागवत
कु. अस्मि संजीव भागवत , कु. मायरा ओमकार भागवत
आणि
समस्त भागवत परिवार
संपर्क क्रमांक : 9820064288